# शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, मुंबई विभाग,

जवाहर बालभवन, नेताजी सुभाष मार्ग,
चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी:- ०२२/२३६३००८१/८६ फॅक्स क्र. २३६३००९०
E-mail :- dydemumbai@yahoo.com, dyde_mumbai@rediffmail.com

---

**महत्त्वाचे / तात्काळ**

जा.क्र. शिउसं/उमावि/दीर्घ सुट्ट्या/२०१३/२९३२८-५३
दिनांक :- 07 सितम्बर SEP 2013

प्रति,

शिक्षण निरीक्षक,
(दक्षिण/पश्चिम/उत्तर) विभाग,
मुंबई.

विषय :- गणेशोत्सवानिमित्त सुट्टीबाबत.

संदर्भ:- १. शासन निर्णय क्र. संप्रप २००६/(१३७/०६)/प्राशि-५, दि. ३०.४.२००७
२. मा.संचालनालय पुणे, यांचे पत्र क्र. अमाशा/२०१३-१४/ दीर्घ सुट्ट्या/ १४क(३)/२५८४-१०० दिनांक १६.३.२०१२
३. या कार्यालयाचे पत्र क्र. शिउस./मुंवि/उमावि/२०१-१४/९६९२-९९, दिनांक ६.४.२०१३.
४. म.न.वि.सेना यांचे दिनांक ६.९.२०१३ चे निवेदन.
५. मा.शिक्षण संचालक, पुणे यांचेशी दिनांक ७.९.२०१३ रोजी झालेली चर्चा.

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भ क्र. २ नुसार या कार्यालयाने सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना पाठविलेल्या परिपत्रकात शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ ची शैक्षणिक सत्रे व दीर्घ सुट्ट्या निश्चित करून दिल्या आहेत. याच परीपत्रकात माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांनी उन्हाळयाची व दिवाळीची दीर्घ सुट्टी कमी करून त्याऐवजी गणेशोत्सव अगर नाताळ या सारख्या सणांचे प्रसंगी ती समाजयोजनाने शिक्षण निरीक्षक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांच्या परवानगीने घेता येईल, असे नमूद केले आहे.

आज दिनांक ७.९.२०१३ रोजी गणेशोत्सव काळात दिनांक ९.९.२०१३ ते १२.९.२०१३ पर्यंत सुट्टी मिळणेसाठी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने निवेदन दिले आहे. याप्रकरणी संदर्भ क्र. ५ नुसार मा.शिक्षण संचालक, पुणे यांचेशी दूरध्वनीवरून चर्चा करण्यात आली.

याबाबत, संचालनालयाच्या उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. २ नुसार दिनांक ९.९.२०१३ ते १२.९.२०१३ पर्यंत सुट्टी देणेबाबत सर्व शाळा व विभागातील संघटनांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे.

याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

(कार्यालयात शिक्षण उपसंचालकांकडून स्वाक्षरित)

शिक्षण उपसंचालक,
मुंबई विभाग, मुंबई

प्रत माहितीस्तव सविनय सादर:-
मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, पुणे ००१.
(सोबत संघटनेचे निवेदन जोडत आहे.)

प्रत माहितीस्तव:-
श्री.आदित्य राजन शिरोडकर, अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना, राजगड ८- मातोश्री, टॉवर्स, पद्माबाई ठक्कर मार्ग, रूपारेल महाविद्यालयाजवळ, माहिम(प.), मुंबई ४०० ०१६.